FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर

0167727

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र ,जिल्हा मुंबई , पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई पहिली खबर क्र. 42 , वर्ष 2019 , दिनांक 31/12/19
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भा. भ्र. प्र. कायदा 1988 , कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act —— , कलमे Sections ——
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ——

3. (a) अपराधाची घटना : वार शुक्रवार , तारीख पासून 26/12/19 वेळ — , तारीख पर्यंत 30/12/19 , वेळ .
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 26/12/19 , वेळ
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 01/19 , तारीख 31/12/19 वेळ 00:45 वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी , लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई , ठिकाणाचे नंबर , गल्ली मुंबई महानगर प्रदेश विकास , रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name प्राधिकरण , मुंबई No. if any MMRDA Ward इमारत , Name of road पश्चिम द्रुतगती
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण बांद्रा (पूर्व) गाव मुंबई , पोस्ट 51 , तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा........,राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव श्री. रमेश (b) वडिलांचे / पतीचे नाव पांडुरंग कोळवडे
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 52 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9867978557
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू , जात Caste हिंदू , उपजात Sub-Caste
(h) पत्ता रूम नं. 6 , गल्ली / सेक्टर नं. 21 , घर / नाव नं. को. औ. हौ. सोसा. , फोन / मो. नं. ........ , पॅन नं. ........ , वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव मानखुर्द , मुंबई - 43 , जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

(1) साहेबराव रोहिदास चव्हाण, वय 33 वर्षे, धंदा- नोकरी-(संगणक चालक/(लिपिक)) उपनिबंधक सहकारी संस्था, MMRDA बिल्डिंग, मुंबई रा. ठि. रुम नं. 401, रामचंद्र अपार्टमेंट, आयरेनगर रोड, डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण, जि. ठाणे.



Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री. रमेश पांडुरंग लोखंडे, वय 52 वर्ष धंदा- फोटोग्राफर, रा. रुम नं. 06. बि. नं. 4. सिंधु को.ऑ. हौ. सोसा. लल्लुभाई पार्क, मानखुर्द. मुंबई यांचा स्वतंत्र पत्रावर जबाब संगणिकृत केला असुन, नीचे गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे

समक्ष

(स्वाक्षरी)

(विनोद स. पाटील)
पोलीस निरीक्षक
ल. प्र. वि. मुंबई.

(स्वाक्षरी)
3/12/19

—फिर्याद—　　　दिनांक— ३१/१२/२०१९

श्री.रमेश पांडुरंग लोखंडे, वय ५२ वर्षे, धंदा—फोटो स्टुडिओ, रा.ठि. रुम नं.०६ बिल्डींग क्र. २१, सिंधु को. ऑ. हौ. सोसायटी, लल्लुभाई कंपाउंड,मानखुर्द, मुंबई—४०००४३. मो.क्र.९८६७९७८५५७.

मी वरील प्रमाणे असून नमुद पत्यावर माझे कुटुंबियांसोबत सन २००५ पासून रहावयास आहे. लल्लुभाई कंम्पाउंड येथे 'सागर फोटो स्टुडिओ' नांवाचे दुकानाचा गाळा भाडे तत्वावर घेतलेला आहे. तसेच श्रीमती सैरूनिसा खान यांचे मयत पती नामे हसमुल्ला खान याचे नावे असलेला गाळा नंबर २, हिमालय, को.ऑ.हौ.सोसायटी, लल्लुभाई कंपाउंड, मानखुर्द पश्चिम, मुंबई नंबर ४०००४३ हा गाळा माझा मुलगा नामे सागर रमेश लोखंडे याचे दंतवैधक दवाखाना करीता भाडयाने घेतलेला आहे.

श्रीमती सैरूनिसा खान यांचे हिमालय को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, बिल्डींग क्रमाक ०६ येथील असलेला गाळा क्रमांक २ त्यांचे पती नामे कै.हसमुल्ला खान यांचे नावावर आहे. हसमुल्ला खान हे दिनांक ०४/१२/२००९ रोजी मयत झालेले आहेत. सदरचा गाळा सैरूनिसा खान यांचे नांवावर हस्तांतर करायचा होता. परंतु सैरूनिसा यांची प्रकृती ठिक नसल्याने व त्या अशिक्षित असल्याने गाळा हस्तांतर करण्याकरीता लागणारी कागदपत्रे उप निबंधक सहाकारी संस्था, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) येथे सादर करण्याकरीता व त्यांना मदत करण्याबाबत विचारणा केली असता मी होकार दिला. व तसे सैरूनिसा यांनी मला लिखीत अधिकार दिले आहेत.

मी दिनांक ०२/१२/२०१९ रोजी सदर गाळयाची कागदपत्रे मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, एमएमआरडीए कार्यालय, बांद्रा पुर्व मुंबई येथील कार्यालयात कार्यरत असलेले क्लार्क श्री. साहेबराव चव्हाण यांचेकडे जमा केली. तेव्हा श्री. साहेबराव चव्हाण यांनी माझे कामाकरीता माझेकडुन रू. ४०००/— लाचेची मागणी केली. नमुद बाब मी सदर गाळयाच्या मालकिण श्रीमती सैरूनिसा खान यांना सांगितली असता त्यांनी चव्हाण यांना लाचेची रक्कम देण्यास नकार दिला. व माझीदेखील श्री. चव्हाण यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसलेने त्यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे मी दिनांक २६/१२/१९ रोजी तक्रार देण्याकरीता लाचलुचपत कार्यालय, वरळी, मुंबई येथे आलो. व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी मुंबई येथील वरिष्ठांना एमएमआरडीएचे श्री.चव्हाण हे माझेकडे रू.४०००/— लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील वरिष्ठांनी तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक विनोद पाटील व सपोआ वैभव पाटील यांना बोलावून माझेशी भेट घालून दिली. तेव्हा मी एमएमआरडीए बांद्रा मुंबई येथील लोकसेवक श्री चव्हाण यांचेविरूध्द श्रीमती सैरूनिसा यांचे पतीचा गाळा श्रीमती सैरूनिसा खान यांचे नांवावर हस्तांतरीत करण्याकरीता रू. ४०००/—लाचेची मागणी करीत असल्याबाबत स्व:हस्ताक्षरात लेखी तक्रार दिली. व त्यासोबत सैरूनिसा खान यांनी मला दिलेले लिखीत पत्र लाचलुचपत प्रतिबंधक यांचे कार्यालयात सादर केले आहे.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पो.नि.विनोद पाटील यांनी मला दिलेल्या सुचनेनुसार लोकसेवक श्री. चव्हाण यांचे एमएमआरडीए कार्यालयात जावून श्रीमती सैरूनिसा यांचे गाळयाचे हस्तातरण करण्याचे कामाकरीता चर्चा करून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेणार आहे असे सांगितले. लोकसेवक व माझे मध्ये होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी माझेकडे लाचेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

त्यानुसार दिनांक २६/१२/२०१९ रोजी पोनि विनोद पाटील व सपोआ वैभव पाटील, पंच व श्रीमती सैरूनिसा व सापळा पथक असे पुढील कारवाई करीता दुपारी शासकीय वाहनाने एमएमआरडीए बांद्रा पुर्व मुंबई कार्यालय येथे जावुन लोकसेवक श्री. चव्हाण यांची भेट घेतली असता भेटी दरम्यान श्री चव्हाण यांनी ''तुमचे काम झालेले आहे, साहेबांच्या सहया बाकी आहेत. तुम्ही दिनांक ३०/१२/२०१९ रोजी दुपारी या'' असे सांगितले. सदरचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले व कार्यालयात येवुन पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक २६/१२/१९ रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक ३०/१२/२०१९ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वरळी मुंबई येथील कार्यालयात आलो. पो.नि.पाटील यांचे सुचनेनुसार चव्हाण यांचे कार्यालयात पुन्हा पडताळणी करण्याचे ठरले व त्यानुसार मी, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे लोकसेवक चव्हाण यांचे कार्यालयात गेलो असता लोकसेवक व माझेत कामाबाबत चर्चा झाली व चव्हाण यांनी मला '' दया...तुम्हाला माहिती आहे ना सगळ... **तुम्हाला तर माहिती आहे ना सगळ... दोन दया...तिन दया...दयायचे तर..**'' अशा प्रकारे लाचेची मागणी केली व मी नंतर पोलीस वाहनाजवळ आलो सदर ठिकाणी पो.नि.पाटील व सापळा पथक तसेच दोन्ही पंच यांनी संभाषण ऐकले. सदर संभाषणात लोकसेवक यांनी माझेकडे दोन ते तीन हजार रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांनतर सापळा कारवाई करण्याचे ठरले. त्यानुसार मला सुचना देण्यात आल्या.

दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व पंच क्रमांक १ असे लोकसेवक यांचे कार्यालयात त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रू. ३०००/– (रु. ५०० च्या ०६ भारतीय चलनी नोटा) यांना अंथ्रेसिन पावडर लावुन घेवुन गेलो असता मी लोकसेवक चव्हाण यांना '' चव्हाण साहेब....तीन हजार रुपये तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी घेवून आलोय...

समक्ष,

VPatil

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Scanned with OKEN Scanner

ठेवू... जरा जास्त होतायत... खिशात टाकू...घ्या..बस..'' असे बोलले त्यानंतर चव्हाण यांनी मला '' हा... दया.... जे असतील ते दया....'' असे सांगुन लोकसेवक चव्हाण यांनी मला पंचासमक्ष मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांचे टेबलाच्या उजव्या बाजुच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्याचे अंगुली निर्देश दिले व लोकसेवकाने स्व:तहा त्याचे टेबलच्या उजव्या बाजुचा ड्रॉवर उघडला असता मी माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रू.३०००/— चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे टेबलाच्या उजव्या ड्रॉवरमध्ये ठेवली व सापळा पथकाने दिलेल्या सुचनेप्रमाणे मी चव्हाण यांचे कार्यालयाचे बाहेर येवुन उजवा हात वर करून इशारा दिला असता सापळा पथकाने लोकसेवक चव्हाण यांना रंगेहाथ पकडले.

माझे लोकसेवक साहेबराव चव्हाण यांचेशी कोणतेही पुर्व वैमनस्य नसुन कोणताही आर्थिक व्यवहार नाही.

तरी दिनांक ३०/१२/२०१९ रोजी केलेल्या सापळा कारवाईत लोकसेवक श्री. साहेबराव चव्हाण यांनी श्रीमती सैरूनिसा यांचे गाळयाचे मयत वारसाचे हस्तांतरण करण्याकरीता रू.३,०००/—ची लाचेची मागणी करून ती स्विकारली असताना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी लोकसेवक श्री. साहेबराव चव्हाण याचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

VPatil

( विनोद पाटील )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

[signature] 31/12/19

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......... तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......... ----

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......... ----

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी फिर्यादीच्या ओळखीच्या महिला नामे सैदुनिसा ख्वाजा हिचे गाळा मयत वारसाचे नावे हस्तांतरण करण्यासाठी फिर्यादीकडे कायदेशीर पारिश्रमिकाखेरीज स्वतःच्या फायद्यासाठी रु 3,000/- लाचेची रक्कमेची मागणी करुन ती स्विकारतांना रंगेहाथ पकडले म्हणून आलोसे यांचेविरुद्ध भारतीय भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. विनोद सर्जेराव पाटील .........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........., जिल्हा ........., राज्य .........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)......... Rank......... No......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to......... (3) Transferred to P. S. ......... District......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा 31/12/19
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ......... विनोद सर्जेराव पाटील
पदनाम Rank......... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. .........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner